# कॉलेजच्या मान्यतेचा प्रश्न अधांतरीच!

## विद्यापीठांना अधिकार देण्यास विरोध ■ राज्य सरकार सुप्रीम कोर्टात

म. टा. प्रतिनिधी

बीए-बीकॉम-बीएस्सी या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या नव्या कॉलेजांच्या प्रस्तावांना राज्य सरकारच्या मान्यतेची वाट बघण्यापेक्षा विद्यापीठ स्तरावरच त्यांना मान्यता दिली जावी, असा निर्णय मुंबई हाय कोर्टाने दिला आहे. राज्य सरकारने याविरोधात सुप्रीम कोर्टात धाव घेतल्याने राज्यातील नव्या कॉलेजच्या मान्यतेबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

राज्यात सुरू होणाऱ्या नवीन कॉलेजांना विनाअनुदानित तत्वावरच मान्यता मिळत असल्याने राज्य सरकारची यामध्ये कोणतीही भूमिका राहत नाही. म्हणूनच या कॉलेजच्या मान्यतेचा अधिकार सरकारकडून काढून घेत विद्यापीठालाच ते अधिकार द्यावेत, असा युक्तीवाद कोकणातील एका कॉलेजने हायकोर्टात मांडला. कोर्टाने १३ जूनला दिलेल्या निकालात हा युक्तीवाद मान्य केला आहे. मात्र, यंदाचे नव्या कॉलेजांचे प्रस्ताव तोपर्यंत राज्य सरकारकडे पोचले असल्याने सरकारने या विरोधात सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. येत्या आठ जुलै रोजी यावरील निकाल येणार आहे.

'या निकालात हाय कोर्टाच्या निर्णयास स्थगिती मिळाल्यास यंदा राज्य सरकारच नव्या कॉलेजला मान्यता देईल. अन्यथा नवी कॉलेज, नव्या अभ्यासक्रमांना मान्यता हे सर्व अधिकार विद्यापीठांकडे जातील,' अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी दिली.

नवीन कॉलेज सुरू करण्यासाठीची नियमावली सरकारकडून यंदा कडक करण्यात आली आहे. आता केवळ संस्थाचालकांचे चेहरे बघून कॉलेजला मान्यता मिळणार नाही. कॉलेज सुरू करायचे म्हटल्यास कॉलेजची जमीन, प्राचार्य, प्राध्यापक, संस्थाचालकांची पार्श्वभूमी अशा सर्व गोष्टी विचारात घेऊनच मान्यता देण्यात येणार आहे. यंदा राज्यभरातून २२५ नव्या कॉलेजांचे प्रस्ताव आले आहेत. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून सर्वाधिक १०० नवीन कॉलेजांच्या प्रस्तावांचा समावेश आहे, असे टोपे यांनी सांगितले.

# राज्यात लवकरच व्यवसायशिक्षण धोरण

म. टा. प्रतिनिधी

आयटीआय, एमसीव्हीसी, पॉलिटेक्निक, बायफोकल अशा दहावी-बारावीच्या स्तरावरील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना एकाच व्यासपीठावर आणत समान दर्जा देणारे व्यवसाय शिक्षणाचे नवे धोरण राज्यात लवकरच लागू होणार आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी त्या संदर्भात घोषणा केली. राज्यासाठी स्वतंत्र व्यवसाय धोरण आखण्याबाबत सिंबायोसिस दूर शिक्षण संस्थेच्या संचालक स्वाती मुजूमदार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. समितीचा अंतिम अहवाल मुजुमदार यांनी टोपे यांच्याकडे शुक्रवारी सादर केला.

या धोरणांतर्गत व्यवसाय शिक्षणासाठी स्वतंत्र महाराष्ट्र व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण कायदा या नावाने नवीन कायदा लागू होणार आहे. या कायद्याचा मसुदा पूर्ण झाला आहे. विधानसभेच्या येत्या २२ जुलैपासून सुरू होत असलेल्या पावसाळी अधिवेशनात या कायद्याचे विधेयक मांडण्यात येईल.